ायला तयार होता.
रम्यान डॉ. अशोकला सहा महिन्यांसाठी ंडनला जावं लागतं. या गोष्टीचा गैरफायदा ामाची सावत्र आई घेते आणि दोघांमध्ये बनाव निर्माण करते. डॉ. अशोकने तिकडे न केल्याचा गैरसमज होऊन दुःखी झालेली ना घर सोडते आणि नेमकी शामूच्या गावात ते. तिथे दुष्ट गंगूच्या तावडीतून शामू तिची टका करून आपल्या घरी आणतो. पण ाला ही डॉक्टर अशोकची प्रेयसी असल्याची ल्पना नसल्यामुळे तो स्वतःच तिच्या प्रेमात

आशा भोसले यांचे अष्टपैलुत्व अनेक गीतांमधून सिध्द

आपल्या सुरेल आवाजाने रसिकांवर मोहिनी घालणाऱ्या आशा भोसले यांनी आपले अष्टपैलुत्व अनेक गीतांतून सिद्ध केले आहे. 'आगे भी जाने ना तू' असो की 'उमराव जान'मधील 'दिल चीज क्या है' ही गझल असो, आशा भोसले यांनी अशा अनेक गीतांतून आपल्या स्वरातील विविधतेचा प्रत्यय दिला आहे. ६९ वर्षीय आशा भोसले यांनी आतापर्यंत अनेक पुरस्कार मिळविले असले तरी आपल्याला 'राजमान्यता' मिळाली नसल्याची खंत त्यांनी अनेकदा बोलून दाखविली होती. आता त्यांना चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च मानाचा समजला जाणारा 'फाळके पुरस्कार' मिळाला आहे. आपले वडील दीनानाथ मंगेशकर यांच्याकडून त्यांनी संगीताचे धडे घेतले. १९४४ मध्ये त्यांनी एका मराठी चित्रपटासाठी 'चला चला नवबाला' हे गीत गायले. हेच त्यांचे पहिले चित्रपट गीत. १९४४ पासून सुरू झालेल्या त्यांच्या सुरेल प्रवासात त्यांनी आतापर्यंत १८ भाषांमध्ये १२ हजारांहून अधिक गाणी म्हटली आहेत. या पूर्वी त्यांनी फिल्मफेअर पुरस्कार आठ वेळा पटकाविला आहे. अमरावती आणि जळगाव विद्यापीठांनी त्यांचा डॉक्टरेट देऊन त्यांचा गौरव केला आहे. याशिवाय राज्य शासनाचे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. 'व्ही' चॅनेलतर्फे दिला जाणारा पुरस्कार त्यांना चार वेळा मिळाला आहे. ओ. पी. नय्यर, राहुल देव बर्मन या संगीतकारांबरोबर आशा भोसलेंनी म्हटलेली अनेक गीते चिरस्मरणीय ठरलेली आहेत. महम्मद रफी यांच्याबरोबरची 'मांग के साथ तुम्हारा', 'अच्छा जी मै हारी', किशोर कुमारबरोबरची 'हाल कैसा है जनाब का', मुकेश बरोबरचे 'वो सुबह कभी तो आयेगी' ही द्वंद्वगीते कमालीची लोकप्रिय ठरली. १९७३ मध्ये पडद्यावर आलेल्या 'हरे राम हरे कृष्ण'मधील 'दम मारो दम' या पाश्चात्य धाटणीच्या गीताने लोकप्रियतेचा उच्चांक केला. ओ. पी. नय्यर यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली आशा भोसले यांनी गायलेली अनेक गीते अजूनही लोकप्रिय आहेत. 'हावडा ब्रिज'मधील 'आईये मेहरबा', 'मेरे सनम'मधील 'जाइये आप कहाँ जायेंगे', 'प्राण जाये पर वचन न जाये'मधील 'चैन से हमको कभी आपने जीने ना दिया' ही ओ.पी.- आशा जोडगोळीची काही स्मरणीय गीते सांगता येतील. ओ. पी. नय्यर यांच्यानंतर राहुल देव बर्मन यांच्याशी आशा भोसले यांची जोडी जमली. तिसरी मंझील, कारवाँ, अपना देश, हरे राम हरे कृष्ण अशा अनेक चित्रपटांतून आर. डी.च्या पाश्चिमात्य सुरावटींना आशा भोसलेंनी खराखुरा न्याय दिला.

पाश्चात्य धाटणीबरोबरच आशा भोसले यांनी 'उमराव जान'मधील गझलांमध्ये आपल्या स्वरातील हळुवारतेचा पुनश्च: अनुभव दिला. या चित्रपटातील 'दिल चीज क्या है' या गीताबद्दल त्यांना पहिल्यांदा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. ■

आशा भोसले यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

पान १ वरून ➤ मोठी बहीण लता मंगेशकर यांच्या महान कर्तृत्वाच्या सावलीतही त्यांनी आपला आवाजाचा अमीट ठसा उमटविला. गानकारकीर्दिला ५७ वर्षे पूर्ण होऊनही आशाबाईचा आवाज नव्या पिढीलाही तितकाच आपलासा वाटत राहिला. पाश्चात्य पॉप गायक बॉय जॉर्ज याच्या बरोबर इंग्रजी हिंदी गाण्यांची सरमिसळ करण्यासारखा आगळा प्रयोगही त्यांनी केला.

आजवर आशाबाईंनी सुमारे १२ हजारांहून अधिक गाणी गायली असून त्यात आठ हजार हिंदी, १२०० मराठी आणि ४५० गुजराथी गाण्यांचा समावेश आहे.

ही अतिशय आनंदाची बाब - लता

पुणे- आशाला फाळके पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आल्याबद्दल मी खूप आनंदित झाले आहे. उशिरा का होईना तिच्या गेल्या कित्येक वर्षांच्या संगीतसेवेची सरकारने दखल घेतली ही समाधानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि हृदयनाथ मंगेशकर यांनी व्यक्त केली.सुप्रसिद्ध पटकथा लेखक व कवी जावेद अख्तर यांनी आशा भोसले यांना दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल अतिशय आनंद व्यक्त करताना म्हटले की, ही तर केवळ सुरुवात आहे. अजून खूप पुरस्कार आशाजींना मिळायचे आहेत.

ज्येष्ठ सिनेनिर्माते व दिग्दर्शक जे. पी. दत्ता यांनी म्हटले की, आशा भोसले या साक्षात सुरांच्या सरस्वतीच आहेत. या सरस्वतीला मानवांनी पुरस्कार देऊन काही मोठे केलेले नाही. या सूरसरस्वतीने येथील लोकांना खूपकाही दिले आहे.

अभिनेते राज बब्बर यांनीही या पुरस्कारानिमित्ताने आशा भोसले यांचे अभिनंदन करतानाच आपल्याला यानिमित्ताने खूप आनंद झाल्याचे म्हटले आहे. तर आशुतोष राणा यांनी आशा भोसले या भावनांचे पदर उलगडून दाखविणाऱ्या गायिका असून त्यांचा या निमित्ताने यथोचित सन्मान झाल्याचे म्हटले आहे. ■

आशा भोसले यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर (पी.टी.आय.)

हिंदी- मराठी चित्रपटगीतांसोबत भारतातील अनेक भाषांतील गीतांना आपल्या सुरेल कंठाचा साज चढविणाऱ्या तसेच संगीताच्या क्षेत्रावर गेली पाच दशके अधिराज्य गाजविणाऱ्या ज्येष्ठ चतुरस्त्र गायिका आशा भोसले यांना सन २००० सालचा अत्यंत सन्मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल दिला जाणारा हा सर्वोच्च पुरस्कार असून दोन लाख रुपये रोख, शाल व सुवर्ण कमळ असे त्यांचे स्वरूप आहे.

चित्रपट गीते, भावगीते, भक्तिगीतांपासून थेट भारतीय पॉप, रॅप संगीतापर्यंत बहुआयामी गीते गाणाऱ्या आशाबाईंनी हा तर आपला मोठाच सन्मान असल्याची प्रतिक्रिया नम्रपणे व्यक्त केली. पुरस्कार जाहीर झाल्याचे वृत्त त्यांना कळविण्यात आले; त्या वेळेस त्या एका जवळच्या नातेवाईकांची विचारपूस करण्यासाठी रुग्णालयात गेल्या होत्या. तेथेच त्यांना पुरस्काराची माहिती देण्यात आली. या पुरस्कारामुळे मला अतिशय आनंद झाला आहे. हा आनंद शब्दात व्यक्त करणे कठीणच आहे, असेही आशाबाई म्हणाल्या.

८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीमध्ये जन्म झालेल्या आशाबाईंनी 'चुनरिया' या चित्रपटाच्या निमित्ताने १९४८ साली चित्रपटसंगीताच्या क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर आशाबाईंनी गेली पाच दशके या क्षेत्रावर आपला वेगळा ठसा उमटविला आहे. संगीताच्या क्षेत्रातील बहुरूपी म्हणूनच त्या प्रसिद्ध आहेत. वयाच्या १० व्या वर्षापासून त्यांनी पार्श्वगायनास सुरुवात केली. वडील पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्या कडून संगीताचा वारसा तर त्यांना घरातच मिळाला. लता मंगेशकर, भाऊ हृदयनाथ यांची जोड त्यांना लाभली. हिंदी -मराठी चित्रपटात भजनांपासून लावण्यांपर्यंत विविध भावभावनांची अनंत रूपे आपल्या कोकीळ कंठातून त्यांनी सादर केली. ९०च्या दशकात तर त्या भारतीय पॉप संगीताच्या सम्राज्ञी ठरल्या. फिरत लाभलेला लवचिक आवाज हे त्यांचे सामर्थ्य आहे.

जांइये आप कहाँ जायेंगे, ये है रेशमी जुल्फों का अंधेरा यासारखी मदहोश करणारी गीते असोत की पीया तू अब तो आजा, दम मारो दम यासारखी जोशीली गाणी असोत, आशाबाईंनी ती सारख्याच ताकदीने पेश केली. त्याचप्रमाणे 'उमराव जान'मधील गझला गातानाही त्यांनी केवळ आपल्या स्वरातून गेल्या शतकातील काळ पुन्हा केला.

गानसम्राज्ञी म्हणून ओळखली जाणारी आपली पान ८ पाहा ➤